# -: आभार :-

म्हैसाळ येथील विठ्ठल संयुक्त सहकारी शेती सोसायटीच्या संदर्भात अलीकडील काळात झालेल्या घडामोडींचा अभ्यास करणे तसेच गतकाळातील कार्याचा पुनर्विचार व्हावा म्हणून मी माझ्या शोधनिबंधासाठी "सहकार व ग्रामिण सामाजिक बदल म्हैसाळ गावातील दलित सहकारी संस्थेचा एक अभ्यास " या शोधनिबंध विषयाची निवड केली. वरील विषयानुरोधाने लेखन व वाचन करण्यासाठी तसेच शोध निबंध पूर्ण करण्यासाठी माझे मार्गदर्शक डॉ. जी. एन. गुरु यांचे बहूमोल सहकार्य लाभले, त्यांनी केलेल्या सुचना व केलेले मार्गदर्शन याबद्दल मी नम्रतापूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो.

या शोध निबंधासाठी राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. के. के. कावळेकर, प्रा. डॉ. अशोक चौसाळकर, प्रॉ. डॉ. वासंती रासम, प्रा. सुरेंद्र जोंधळे, यांनी मला वेळोवेळी सहकार्य व मार्गदर्शन केले. तसेच विठ्ठल सहकारी संयुक्त शेती सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी आम्हास लागणारी कागदपत्रे, वार्षिक अहवाल तसेच सोसायटीच्या संदर्भातील इतर माहिती देण्यास सहकार्य केले.

शोधनिबंधासाठी दैनिक नवशक्ती मुंबई, लोकसत्ता, तरुणभारत, इत्यादी दैनिकांचा वापर झाला. तसेच बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय, शिवाजी विद्यापिठ कोल्हापूर या ग्रंथालयाची खूपच मदत झाली.

हा शोध निबंध पूर्ण करण्याच्या कामी माझी बहिण सौ. शालन भोरे हिचे सहकार्य लाभले. तसेच अनेकांचे प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष सहकार्य लाभले.

वरील सर्वांचे आभार मानणे मी माझे नैतिक कर्तव्य समजतो.